# प्रकरण ५ वे

## कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी


५•१ स्थापना

५•२ मुख्य बाजार आवार

५•३ दुय्यम बाजार आवारांची स्थापना

५•४ बाजार समिती

५•५ शेतमालाचे नियमन

५•६ शेतमालाचे प्रमाणीकरण

५•७ शेतमालाचे सौदे

५•८ भाव प्रसिध्दी

५•९ गोदाम व्यवस्था

५•१० बाजार आवारातील सुविधा

५•११ कर्मचारी वर्ग

५•१२ विविध प्रकारच्या अनुज्ञाप्तीधारकांची संख्या व शुल्कदर


५•१३ अर्थव्यवस्था

५•१३•१ उत्पन्नाचे मार्ग

५•१३•२ समितीचा खर्च

५•१४ हमाली व तोलाईदर


-x-x-x-x-x-


बार्शी
तालुका
उ.
२ ० २ कि.मी.
बार्शी
१. खडकोणी
२. कोरेगांव
३. चुंब
४. धामणगांव
५. कातेगांव
६. कळमवाडी
७. भनसाळे
८. उंबरगे
९. बारिगांव
१०. चारे
११. वालवड
१२. पिंपळवाडी
१३. उकडगांव
१४. शिराळे
१५. पाथरी
१६. धानोरे
१७. आमुळगांव
१८. आगळगांव
१९. बेलगांव
२०. मांडेगांव
२१. खडकलगांव
२२. पिंपळगांव (धस)
२३. देवगांव
२४. कांदलगांव
२५. भाडेगांव
२६. शेलगांव
२७. ताडसौंदणे
२८. भोयरे
२९. वानेवाडी
३० कुसळंब
३१ पुरी
३२ धारी
३३ पांगरी
३४ पांढरी
३५ घोळवेवाडी
३६ चिंचोली
३७ जहानपूर
३८ पिंपळगांव
३९. धोत्रे
४०. अरणगांव
४१. जामगांव
४४. उपळाई
४५. पापळवाडी
४६. तावडी
४७. रवालगांव
४८. येळंब
४९. ममदापूर
५०. गोरमाळे
५१. कारी
५२ अंबेजवळगे
५३. कौडगांव
५४. इंदापूर
५५. नारी
५६. चिखर्डे
५७. महागांव
५८. तांदुळवाडी
५९. शेळगांव
६०. गटाचीवाडी
६१. अलीपूर
६२. खांडवी
६४. शेंद्री
६५. कासारवाडी
६६. वल्लेवाडी
८४ साकत
८५ कव्हेवाडी
८६ पानगांव
८७ कन्हे
८८ कोरफळे
८९ श्रीपत पिंपरी
९० भोइंजे
९१ गुळपोळी
९२ रास्तापूर
९३ उंडेगांव
९४ काळेगांव
९५ मालेगांव
९६ धामणगांव
९७ नाडोळे
९८ मुंगशी (वा.)
९९ निंबळक
१०० झाडी
१०१ सुरेगांव
१०२ गोडगांव
१०३ रुई
१०४ मालेगांव
१०६ सर्जापूर
१०७ वैराग
१०८ दुर्लेवाडी
१०९ धोराळे
११० इर्ले

नकाशा क्र. ५.१

५·१ स्थापना :

सुनियंत्रित बाजारपेठांची स्थापना करुन कायदेशीर व्यवहाराची हमी देण्याच्या उद्देशाने १९३९ साली अॅग्रीकल्चरल प्रोडयूस मार्केट अॅक्ट नावाचा कायदा मुंबई सरकारने संम्मत केला· हया कायद्यानुसार १ ऑगस्ट, १९४७रोजी बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना झाली· कायद्यातील तरतूदी-नुसार प्रथम सरकार नियुक्त बाजार समिती अस्तीत्वात आली, आणि त्याची पहिली सभा दिनांक ३·३·१९४८ रोजी झाली·[१] मार्केट अॅक्टच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीकरीता दि·४ जानेवारी,१९४८ च्या सभेमध्ये बाजार समितीने उपविधी तयार केली· तथापी या उपविधींना डायरेक्टर ऑफ अॅग्रीकल्चरल मार्केटींग अॅन्ड रुरल फायनान्स, मुंबई यांचेकडून दयाव्या लागणा-या मंजूरीस वेळ लागल्यामुळे बाजार समितीचे प्रत्यक्ष कामकाज दिनांक १५ नोव्हेंबर,१९४९ पासून सुरु झाले· यानंतर २६ जून, १९५० रोजी निवडणूक घेऊन, पहिले लोकनियुक्ती प्रतिनिधी मंडळ अधिकृतपणे दिनांक १५ मे, १९५१ पासून अस्तित्वात आले·

५·२ मुख्य बाजार आवार :

"सुरवातीच्या काळामध्ये बाजार समितीच्या मालकिचे मार्केट यार्ड नव्हते· अडत बाजार म्हणून ओळखल्या जाणा-या नगरपालिकेच्या हद्दीतच बाजाराच्या नियमानाचे कामकाज सुरु झाले· मार्केट यार्डाच्या उभारणीकरिता बार्शी शहराजवळची तेलगिरणी या नावाने ओळखली जाणारी सर्व्हे नं·२५/१, २५/२, २५/५, ३८/३ व ३८/४ ची सहा एकराची जागा निवडण्यात आली· परंतु ही जागा भावी विकासाच्या दृष्टीने अपुरी असल्याने या जागेचा विचार सोडून देण्यात आला·"[२]

" बाजार समितीचे माजी सभापती श्री·दि·वा·नारकर यांनी व्यापारी वर्गाच्या पसंतीने श्री·ए·जी·हिरेमठ यांची बार्शी-लातूर रस्त्यावरील स·नं·६२७/१ व सर्व्हे नं·६२७/२, ही १५ हेक्टर क्षेत्रफळाची जागा विकत घेतली·

मुंबई सरकार पत्र क्र·पी·एम·के·१९५२ दिनांक १० ऑगस्ट, १९५२ च्या जाहीरनाम्यान्वये मार्केट यार्ड म्हणून जाहीर करण्यात आले·"[३] परंतु सदर जागा मार्केट यार्डकरिता शहरापासून लांब व गैरसोयीची आहे अशी व्यापाऱ्यांनी तक्रार केल्यामुळे ही जागा रद्द करण्यात आली·

मार्केट यार्डकरिता कोणती जागा निवडावी या एकाच महत्वाच्या प्रश्नांवर १२ ते १३ वर्ष खर्ची पडली· त्यानंतर संस्थेस १९६१ मध्ये शहरालगत रेल्वे व एस्·टी·स्टॅन्ड जवळ अत्यंत सोयीस्कर अशी सर्व्हे नं·५६ मधील १७ हेक्टर जागा मान्य झाली आणि ती उपलब्ध झाल्यावर त्या जागेत बाजार समितीच्या कार्यालयांची इमारत बांधली गेली· तसेच अडत बाजारासाठी १४२ गाळे सुसज्ज स्थितीत व्यापाऱ्याला उपलब्ध करुन देण्यात आले·

७ जून, १९६४ रोजीच्या बाजार समितीच्या सभेमध्ये मा·पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या स्मरणार्थ मुख्य बाजार आवाराला "पंडीत जवाहरलाल नेहरु मुख्य बाजार आवार" म्हणून नामकरण करणेबाबतचा ठराव संमत झाला·

## ५·३ दुय्यम बाजार आवारांची स्थापना :

बार्शी शहरापासून १४ मैल अंतरावर वैराग, या गांवामध्ये बार्शी अडत बाजारामधील पध्दतीप्रमाणे बाजार चालत असे· "या गांवी सब-मार्केट यार्ड स्थापन केल्यास तेथील शेतकरी व व्यापारी यांना मार्केट अॅक्टचे फायदे मिळतील या उद्देशाने बाजार समितीने वैराग येथे २१ डिसेंबर, १९५५ रोजी वैराग दुय्यम बाजार आवाराची स्थापना केली·"[४] या बाजार आवारासाठी बाजार समितीने २५ एकर जागा विकत घेऊन सदर बाजारात अडत व्यापाऱ्यांसाठी २३ गाळे बांधून व्यापाऱ्यांना दिले आहेत· या बाजार आवारांमध्ये जनावरांचा व कडब्यांचा बाजार भरतो· वीज, फोन, पाणीपुरवठा इ· सोई या आवारात उपलब्ध आहेत·

बार्शी तालुक्यातील येडशी आणि कसबे-तडवळे या मराठवाडयाच्या

सिमेवरील गांवात सब-मार्केट यार्डाची स्थापना दि. ९ ऑक्टोबर,१९६६ रोजी झाली असून त्या त्या गांवच्या ग्रामपंचायतीच्या जागेत बाजार भरतो. परंतु १९८५ साली बार्शी तालुक्यातील या दोन गांवासह एकूण ८ गांवे उस्मानाबाद जिल्हयात गेल्यामुळे येडशी व क. तडवळे हे उप बाजार आवार उस्मानाबाद बाजार आवाराच्या नियंत्रणाखाली गेले आहेत.

५.४ बाजार समिती :

सन १९६३ च्या कायद्यानुसार प्रत्येक नियंत्रित बाजार पेठेला एक बाजार समिती नेमावी लागते. ही समिती सभासदांच्याकडून बहुमताने निवडून आलेली असते. बार्शी नियंत्रित बाजार समितीसाठी निवडावयाच्या बाजार समितीची रचना सारणी क्रमांक ५.१ मध्ये दर्शविली आहे.

सारणी क्रमांक ५.१

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभासदांची वर्गवारी

| अ.नं. | सभासदांची वर्गवारी | सभासद संख्या |
|---|---|---|
| १. | सोसायटी मतदार संघ | ७ |
| २. | ग्रामपंचायत मतदार संघ | ३ |
| ३. | व्यापारी मतदार संघ | ३ |
| ४. | सहकारी संस्था मतदार संघ | १ |
| ५. | तालुका पंचायत समिती बार्शी | १ |
| ६. | स्थानिक स्वराज्य संस्था | १ |
| ७. | सरकार नियुक्त | २ |
| | एकूण .. | १८ |

आधार : कृषी उत्पन्न बाजार समिती,बार्शी यांच्या दि.५.११.१९८९ च्या कार्यालयीन माहितीनुसार.

वरील प्रमाणे लोकनियुक्त बाजार समितीमध्ये सहा मतदार संघातून सोळा (१६) सभासद निवडले जातात. आणि सरकार नियुक्त दोन (२) सभासद असतात. अशी एकूण १८ सभासदांची समिती आहे. त्यामधून एक सभापती व एक उपसभापती निवडला जातो.

## ५.५ शेतमालाचे नियमन :

बाजार समितीच्या स्थापनेनुसार फक्त चारच शेतमालाच्या नियमनाचे अधिकार बाजार समितीकडे होते. परंतु शेतक-यांच्या आर्थिक हितासाठी आणि बाजार समितीच्या उत्पन्नामध्ये वाढ करण्याच्या हेतूने क्रमाक्रमाने बाजार समितीने शेतमाल नियमनाच्या कामकाजाची व्याप्ती वाढविण्यास सुरुवात केली, आणि सध्या १८ शेतमालांचे व जनावरांचे नियमन केले आहे. शेतमालाच्या नियमनाच्या जाहिरनाम्याचा क्रमांक, तारीख व अंमलबजावणी तारीख सारणी क्रमांक ५.२ मध्ये दर्शविलेला आहे.

### सारणी क्रमांक ५.२

शेतीमालाच्या नियमनाच्या जाहिरनाम्याचा क्रमांक व तारीख दर्शविणारी माहिती

| अ.नं. | नियमित शेतमाल | सरकारी जाहिरनामा | अंमलबजावणी तारीख |
|---|---|---|---|
| १. | शेंगा, शेंगदाणे, कापूस, रुई, | ९४२२-३९ दि.९.७.४७ | ७.११.१९४९ |
| २. | तूर, मूग, उडीद, करडई | पी.एम.ए.३०५१ दिनांक १.९.१९५१ | १.११.१९५१ |
| ३. | ज्वारी, बाजरी, गहू, हरबरा, जोड, तीळ, जवस, हळद, धणे, मिरची (सुकी) | पी.एम.ए. दिनांक २९.५.१९५४ | २७.५.१९५५ |

सा रणी क्रमांक ५.२ पुढे चालू

| अ.नं. | नियमित शेतमाल | सरकारी जाहिरनामा | अंमलबजावणी तारीख |
|---|---|---|---|
| ४. | गुळ व कडबा | पी.एम.ए/२९५६ सी, दिनांक २६.६.५६ | २२.४.१९५७ |
| ५. | चिंच, एरंडी, अंबाडी, कारळे साळी व जनावरे, (गाय, बैल, म्हैस, रेडे, शेळ्या व मेंढया) | पी.एम.-१४८ बार्शी | १.१०.१९६० |
| ६. | वरई(वोळे) मका, सावा, हुलगा, व कांदा | सी.एम.आर/आर १२६९ | २०.१०.१९६९ |
| ७. | बटाटा, लसून, मटकी, मोहरी | सी.एम.आर.आर.१२ बार्शी/७६ दि.१.५.७६ | १.३.१९७७ |
| ८. | निंबोळी, निंबोळी-बी, सुर्यफुल, चिंचोके | पी.एम.आर.१०बार्शी दि.५.४.८३, ३०.५.८३ | ५.११.१९८३ |

आधार : वार्षीक अहवाल कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी. सन १९८५-८६ पान नं.२.

५.६ <u>शेतमालाचे प्रमाणीकरण</u> :

शेतमालाच्या गुणवत्तेनुसार किंमत प्राप्त व्हावी आणि ग्राहकांना निर्मळ शेतमाल मिळावा यासाठी बार्शी बाजार आवारात १९६३ पासून व्यापारी पध्दतीच्या सुविधा अंमलात आणलेल्या आहेत. सुरूवातीच्या काळात फक्त शेंगा व ज्वारीची प्रतवारी सुरु केली. मा.पणन संचालक, पुणे यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे प्रतवारीची व्याप्ती वाढविण्यात आली. सध्या शेंगा, तूर, मूग, उडीद, ज्वारी व हळद या ६ शेतमालांची लिलाव पध्दतीने विक्री होण्यापूर्वी त्यांची प्रतवारी केली जाते.[५]

५·७ शेतमालाचे सौदे :

बार्शी बाजार आवारामध्ये सकाळी ९ ते १ व दुपारी ३ ते ५ यावेळेत शेतमालाचे जाहीर लिलाव होतात· लिलाव पध्दती प्रथम पासूनच अस्तित्वात आहे· जो खरेदीदार जास्तीत जास्त भाव बोलतो त्यांच्या नांवे शेतमालाचा सौदा झाला, असे समजून तो माल पुकारलेल्या दराला खरेदी करतो· यावेळी मार्केट कमिटीचे अधिकारी आणि शेतमालाचे उत्पादक हजर असतात· शेतमालाच्या मालकाला लिलावातील किंमत पसंत पडली नाही· तर माल न विकावयाचे स्वातंत्र्य उत्पादकाला असते· लिलावात ठरलेली किंमत मार्केट कमिटीच्या सचिवाच्या लेखी परवानगी शिवाय बदलता येत नाही· या लिलाव पध्दतीमुळे शेतकऱ्याला योग्य किंमत मिळू शकते· अशा व्यवहारांवर बाजार समितीचे पूर्ण नियंत्रण असल्यामुळे लिलावाच्या वेळी अधिक दराने भाव बोलून खरेदीदाराने पुन्हा सौदा कमी दराने मान्य करुन घेणे यासारखी अनिष्ठ प्रथा बंद झाली·

५·८ भाव प्रसिध्दी :

शेतमाल विक्रीसाठी आणणारे मालधनी आणि बाजारपेठेतील इतर व्यापारी यांना शेतमालाचा भाव, आवक, विक्री इत्यादींची माहिती व्हावी म्हणून बाजार समिती कांही प्रमुख शेतमालाचे सर्वसाधारण दररोजचे भाव मे· डेप्युटी डायरेक्टर ऑफ मार्केटींग (सर्व्हे अॅण्ड रिसर्च) महाराष्ट्र राज्य,मुंबई· यांना तारेने पाठविले जाते· सदरचे बाजार भाव दररोज सायंकाळी ७·१० (सातदहा) वाजता मुंबई- पुणे व सांगली या आकाशवाणी केंद्रावरुन प्रक्षेपित केला जातो·

दररोज होणारी शेतमालाची विक्री किमान व कमाल भाव यासंबंधीची माहिती बाजार समितीच्या कार्यालयासमोरील सुचना फलकावर प्रसिध्द करणे बंधनकारक असते·

दर शुक्रवारी बाजार पेठेतील साप्ताहिक समालोचना संबंधीची माहिती प्रादेशिक वर्तमानपत्रासाठी पाठविले जाते. या समालोचना मध्ये बाजार भावाची व चढ-उताराची कारणमिमांसा विस्तृतपणे निवेदन केले जाते. याचा फायदा शेतकरी व व्यापारी व इतर व्यावसायीकांना होतो.

## ५.९ गोदाम व्यवस्था :

बार्शी बाजार समितीच्या मालकीचे एक सुध्दा गोदाम नाही. तथापि बाजार आवारामध्ये महाराष्ट्र स्टेट वेअर हौसिंग कार्पोरेशनचे ३(तीन) गोदामे आहेत. या गोदामांची क्षमता ५७२० मे.टनापर्यंत आहे. या गोदामामुळे बार्शी तालुक्यातील शेतक-यांचा माल साठविण्याची चांगली व्यवस्था झाली आहे. याशिवाय वैराग उपबाजार आवारात शासकीय योजनेनुसार एक गोदाम बांधण्यात आले आहे.

## ५.१० बाजार आवारातील सुविधा :

कृषी उत्पन्न बाजार समितीने आपल्या आवारात शेतकरी, व्यापारी, अडते, इत्यादीसाठी अनेक प्रकारांच्या सुविधा पुरविलेल्या आहेत. उदा. सुसज्ज गाळे, वीज, दूरध्वनी, बॅंन्का, पोस्ट, उपहारगृहे, इत्यादी शेतकरी व हमालांसाठी गाडीतळ, पाण्याचे हौद, गुरांच्या बाजारात पत्राचे शेड, पिण्याच्या पाण्याची सोय इत्यादी सुविधाही उपलब्ध आहेत.

## ५.११ कर्मचारी वर्ग :

उत्पन्न बाजार समितीमधील कर्मचा-यांची वर्गवार संख्या सारणी क्रमांक ५.३ मध्ये दर्शविलेली आहे.

## सारणी क्रमांक ५·३

### उत्पन्न बाजार समितीमधील कर्मचाऱ्यांची वर्गवारी संख्या

| अ·नं· | कर्मचाऱ्याची वर्गवारी | कर्मचाऱ्यांची संख्या |
|---|---|---|
| | अ) वरिष्ट अधिकारी | |
| १· | सचिव | १ |
| २· | सहाय्यक सचिव | १ |
| ३· | लेखापाल | १ |
| | ब) वरिष्ट नोकर | |
| ४· | सांख्याकी | १ |
| ५· | वरीष्ट लिपीक | १ |
| ६· | प्रतवारी तज्ञ | २ |
| ७· | पर्यवेक्षक | २ |
| ८· | निरीक्षक | १ |
| ९· | लेखनिक (लिपीक) | ९ |
| | क) कनिष्ट नोकर | |
| १०· | शिपाई | ९ |
| ११· | प्रतवारी सहाय्यक | १ |
| | एकूण ·· | २९ |

आधार : वार्षिक अहवाल, कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी सन १९८६-८७·

सारणी क्रमांक ५.३ वरून असे दिसते की, कृषी उत्पन्न बाजार समितीत काम करणारे वरिष्ठ अधिकारी, वरिष्ठ नोकर व कनिष्ट नोकर असे त्रिस्तरीय एकूण २९ कर्मचारी आहेत.

## ५.१२ विविध प्रकारच्या अनुज्ञाप्तिधारकांची संख्या व शुल्कदर :

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य किंवा दुय्यम बाजारात किंवा बाजार क्षेत्रातील अन्य ठिकाणी शेती उत्पन्नाची खरेदी विक्री व इतर अन्य संबंधीत व्यवहार करू इच्छिणा-या व्यक्तींना बाजार समितीच्या नियमानुसार परवाना घ्यावा लागतो आणि दरवर्षी त्याचे नुतनीकरण करावे लागते.

सारणी क्रमांक ५.४ मध्ये अनुज्ञाप्तीची वर्गवारी, अनुज्ञाप्ती शुल्क, नुतनीकरण शुल्क आणि एकूण अनुज्ञाप्तींची संख्या दर्शविली आहे.

### सारणी क्रमांक ५.४

### अनुज्ञाप्तीचे वर्गीकरण शुल्क, नुतनीकरणाचे दर आणि एकूण संख्या : इ.स.१९८८-८९

| अ.नं. | अनुज्ञाप्तीचे वर्गीकरण | अनुज्ञाप्ती शुल्कांचा वार्षिक दर (रु.) | अनुज्ञाप्ती नुतनीकरण शुल्कांचा वार्षिक दर | अनुज्ञाप्तीची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | अडत्ये अ वर्ग | १०० | १०० | २११ |
| | अडत्ये ब वर्ग | १०० | १०० | ०१ |
| २. | व्यापारी अ वर्ग(जनावरे सोडून) | १०० | १०० | २४० |
| | व्यापारी ब वर्ग( -"- ) | ५० | ५० | ०८ |
| | व्यापारी क वर्ग( -"- ) | ५० | ५० | ७१ |

सारणी क्रमांक ५·४ पुढे चालू

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| | व्यापारी ड वर्ग(जनावरे सोडून) | ५० | ५० | ०६ |
| | व्यापारी इ वर्ग(जनावरांसाठी) | ३० | ३० | ०५ |
| | व्यापारी फ वर्ग(कडब्यासाठी ) | १० | १० | ०५ |
| | व्यापारी ग वर्ग(जनावरांचे दलाल) | १० | १० | २७ |
| ३· | प्रक्रीया करणारे | ३० | ३० | ३३ |
| ४· | तोलाईदार | १० | १० | ६८ |
| ५· | वखारवाला | १५ | १५ | ०१ |
| ६· | गाडीभाडे व वटवण अभिकर्ता | १० | १० | २२ |
| ७· | मदतनिस (मुनिम) | २ | २ | २६६ |
| ८· | हमाल | २ | २ | ४६१ |
| ९· | गोदाम नोंदणी फी | १ | १ | १२७ |
| १०· | गाडीवान | २ | २ | २६६ |

आधार : कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी कार्यालयीन माहिती दिनांक ५·११·१९८९·

कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी येथील अनुज्ञाप्तीचे एकंदर १० गटात वर्गीकरण केलेले आहे· "अ" वर्गातील अडते २३१ आहेत· परंतु "ब" वर्गामध्ये फक्त ३ अडते आहेत· अ,ब वर्ग अडते आणि अ वर्ग व्यापारी यांना अनुज्ञाप्तीचे शुल्काचा व नुतनीकरण शुल्काचा वार्षिक दर १०० रु· या प्रमाणे सारखाच आहे· व्यापाऱ्यांच्या व्यवसायानुसार वर्गक्रम व अनुज्ञाप्तीचे दर उतरत्या क्रमाचे आहेत· अडत्यांना मदत करणारे मदतनिस उदा·मुनिम,तोलाईदार, हमाल, गाडीवान इत्यादींना बाजार आवारामध्ये आपआपले व्यवहार करण्या-

साठी बाजार समितीकडून परवाने घेऊन प्रत्येकवर्षी त्यांचे नुतनीकरण करावे लागते.

५.१३ अर्थव्यवस्था :

कोणत्याही संस्थेला आपल्या दैनंदिन कारभार चालविण्यासाठी खर्च करावा लागतो आणि हा खर्च भागविण्यासाठी उत्पन्नाचे मार्ग निर्माण करून उत्पन्न प्राप्त करावे लागते. यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीला नियमाच्या आधीन राहून उत्पन्न मिळवावे लागते व नियमानुसारच खर्चही करावा लागतो. त्याचे तपशील विवरण खालील प्रमाणे आहे.

५.१३.१ उत्पन्नाचे मार्ग :

१) बाजार शुल्क :

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात ज्या व्यक्ति शेतमालाच्या व अन्य नियंत्रित जिन्नसांची खरेदी विक्री करतात त्यांच्यावर खालील दराने बाजार शुल्क लादलेला आहे.

| शुल्काचा प्रकार | आकारले जाणारे शुल्क |
|---|---|
| १) बाजार शुल्क (सर्व नियंत्रित शेतमालासाठी) | १०० रुपये किंमतीच्या शेतमालाच्या विक्रीस ७५ पैसे प्रमाणे शेतमाल खरेदीदारांकडून वसूल केले जातात. |
| २) बाजार शुल्क(जनावारांसाठी) | गाय,म्हैस,रेडे अशा प्रत्येक जनावरांच्या (रु.१००/- पर्यंत किंमतीच्या) नगास, शेकडा १ रुपया आणि १०० रु. पेक्षा जास्त किंमतीवर एक रुपया पाच पैसे खरेदीदारांकडून वसूल केले जातात. |

| शुल्काचा प्रकार | आकारले जाणारे शुल्क |
|---|---|
| | शेळया, मेंढया, बोकडे यांच्या प्रत्येक नगाच्या किंमतीच्या शेकडा ५० पैसे खरेदीदारांकडून घेतले जातात· |
| ३) बाजार शुल्क (कडबा गाडी) | कडब्याच्या विक्रीवर शेकडा ७५ पैसे बाजार शुल्क खरेदीदारांकडून वसूल केले जातात· |
| ४) प्रतवारी शुल्क( शेंगा,तूर,मूग, उडीद,हळद,ज्वारी इत्यादीसाठी) | १०० रुपयाच्या मालाच्या विक्रीवर ५ पैसे प्रमाणे शेतमाल विक्रेत्याकडून घेतले जातात· |

२) <u>अनुज्ञाप्ती शुल्क</u> :

कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शीच्या मुख्य व दुय्यम आवारात खरेदीविक्रीचे व्यवहार करणा-या व्यक्ती, अडत्ये, प्रक्रिया करणारे, तोलाईदार, वखारवाले, गाडीवान, मदतनीस, हमाल इत्यादींना नियमानुसार समितीकडे अर्ज करुन व त्याचे शुल्क भरुन परवाना घ्यावा लागतो· या परवाना शुल्कामुळे बाजार समितीला उत्पन्न मिळते· अनुज्ञाप्ती शुल्क दर सारणी क्रमांक ५·४ मध्ये दाखविले आहेत·

३) <u>इतर मार्गाने मिळणारे उत्पन्न</u> :

बाजार शुल्क व अनुज्ञाप्ती शुल्क व्यतिरिक्त जे उत्पन्न मिळते त्याचा समावेश इतर उत्पन्नात केला जातो· यामध्ये उपहारगृह व खतविक्रीकेंद्र,पानपट्टी, रसपान गृहे, अडत गाळयापासून मिळणारा मासिक मोबदला, हयांच्यापासून

उत्पन्न मिळते. तसेच प्लॉट व जागा भाडे, मार्केट यार्ड हद्दीतील मोकळया जागेच्या वापरावरील भुईभाडे, शेड, चिपाडांची विक्री, नमुने अर्ज व नकला फी, व्याज व लाभांश इत्यादी पासून बाजार समितीला उत्पन्न मिळते.

५.१३.२ समितीचा खर्च :

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या खर्चाच्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

१) आस्थापना खर्च :

कृषी उत्पन्न बाजार समितीला दैनंदिन कारभार चालविण्यासाठी कर्मचारी वर्गावर जो खर्च करावा लागतो त्याला आस्थापना खर्च असे म्हणतात. यामध्ये नोकरांचे पगार, प्रवास भत्ता, गुरांचा बाजार भत्ता, प्रशासकीय कामांचा भत्ता इ. चा समावेश होतो. आस्थापनांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| ऑडीट फी (खात्यामार्फत होणारे ऑडीट) | रुपये २,०००/- |
| गुरांचा बाजार भत्ता | प्रतिदीन रु.१०/-प्रमाणे |
| कर्मचारी प्रवास भत्ता | जाणे येणेचा खर्च |
| जेवण भत्ता | प्रतिदीन रु.१८/-प्रमाणे. |

२) सभा व सभासद खर्च :

सभा व सभासद खर्चामध्ये सभापती व उपसभापती यांचे मानधन सभेशिवाय आणि सभेकरीता द्यावे लागणारे सभासद भत्ते व मिटींग खर्च इत्यादी खर्चाचा समावेश होतो.

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभासदांना खालील प्रमाणे मानधन व भत्ते दिले जातात.

सभापतीला दरमहा रुपये ५००/- आणि उपसभापतीला दरमहा रु.२५०/- प्रमाणे मानधन दिले जाते. इतर सभासदांना मानधन दिले जात नाही.

व्यवस्थापनाच्या सभासदांना मिटींग मानधन म्हणून प्रत्येकी रु.२५/- प्रमाणे दिले

### ३) प्रवास भत्त्याचे दर / नियम :

| | |
|---|---|
| रेल्वे प्रवास | : पहिल्या वर्गाचे भाडे |
| एस.टी.ने प्रवास | : एस.टी.चे दिडपट भाडे. |
| स्वत:च्या स्वयंचलीत दुचाकी वाहनाने प्रवास असल्यास | : एस.टी.चे दिडपट भाडे. |

### ४) दैनिक भत्ता :

| | |
|---|---|
| बाजार क्षेत्रात प्रवास केल्यास | : भत्ता देण्याची तरतूद नाही. |
| बाजार क्षेत्राचे बाहेर महाराष्ट्र राज्यात कोठेही (महानगरपालिकेच्या हद्दी खेरीज) | : रुपये २५/- प्रमाणे. |

### ५) प्रशासकिय खर्च :

प्रशासकिय खर्चामध्ये प्रामुख्याने छपाई, बांधकाम खर्च, स्टेशनरी , पोस्टेज अँन्ड टेलीग्राम, टेलीफोन, कायदा व कोर्ट खर्च, भेटी व सभासद खर्च, निवडणूका, बाजार समिती सहकारी संघ वर्गणी, कर, वृत्तपत्रे, नियतकालीके, जाहिरात व प्रसिध्दी खर्च, देणगी खर्च इत्यादी बाबींवरील खर्चाचा समावेश होतो. याशिवाय समितीला देखभाल खर्चांतर्गत मार्केट यार्ड मेंन्टेनन्स खर्च, किरकोळ दुरुस्त्या, वृक्षारोपन व बागबगीचा इत्यादी बाबींवर खर्च करावा लागतो.

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उत्पन्न खर्चाचा तपशील सारणी क्रमांक ५.४ मध्ये दिला आहे. उत्पन्नातून खर्च वजा जाता जी शिल्लक राहते, म्हणजे बचत होते ती दरवर्षी कायम निधीकडे वर्ग केली जाते. यामुळे कायम निधीत वाढ झालेली दिसून येते.

## सारणी क्रमांक ५·५

### सन १९४९-५० स्थापनेपासून सन १९८०-८१ अखेर उत्पन्न, खर्च, बचत व कायम निधी दर्शविणारे पत्रक

| बाजार वर्ष | एकूण उत्पन्न | एकूण खर्च | बचत | कायम निधी |
|---|---|---|---|---|
| १९४९-५० | ३०,०३६·१६ | १०,८६३·२४ | २२,१७२·९२ | २२,१७२·९२ |
| १९५०-५१ | १८,६३७·२३ | १२,६१२·१८ | ६,०२५·०५ | २८,१९७·९७ |
| १९५१-५२ | २९,१८५·२८ | १४,८८७·०५ | १४,२९८·२३ | ४२,४९६·२० |
| १९५२-५३ | २९,७५४·८९ | १६,६३१·९७ | १३,१२२·९२ | ५५,६१९·१२ |
| १९५३-५४ | ३४,८८५·४७ | १८,९७७·७२ | १५,९०७·७५ | ७१,५२६·८७ |
| १९५४-५५ | ४२,७७४·४२ | २५,६३६·५१ | १७,१३७·९१ | ८८,६६४·७८ |
| १९५५-५६ | ५५,७१६·३३ | २५,५१७·६१ | ३०,१९८·७२ | १,१८,८६३·५० |
| १९५६-५७ | ५७,९७७·३३ | २५,७३८·५६ | ३२,२३८·७७ | १,५१,१०२·२७ |
| १९५७-५८ | ६०,९९८·२९ | २८,९९२·२२ | ३२,००६·०७ | १,८३,१०८·३४ |
| १९५८-५९ | ६५,२१५·५५ | ३४,८५३·८९ | ३०,३६१·६६ | २,१३,४७०·०० |
| १९५९-६० | ६८,२०२·०० | ३५,५९५·६८ | ३२,६०६·३२ | २,४६,०७६·३२ |
| १९६०-६१ | ८४,७०२·९० | ४१,८५६·६३ | ४२,८४६·२७ | २,८८,९२२·५९ |
| १९६१-६२ | ८२,८२६·५३ | ४७,३२५·७५ | ३५,५००·७८ | ३,२४,४२३·३७ |
| १९६२-६३ | ८९,३१४·४५ | ६२,८२४·६६ | २६,४८९·७९ | ३,५०,९१३·१६ |
| १९६३-६४ | १,०५,०८४·१६ | ७२,०७८·६८ | ३२,९८५·४८ | ३,८३,८९८·६४ |
| १९६४-६५ | १,३८,०३५·२४ | १,०५,४८३·८२ | ३२,५५१·४२ | ४,०६,४५०·०६ |
| १९६५-६६ | १,५१,२२३·७५ | १,११,१४२·७४ | ४०,०८१·०१ | ४,४६,५३१·०७ |
| १९६६-६७ | १,८७,५२१·७७ | १,१९,५९६·१४ | ६७,९२५·६३ | ५,१४,४५६·७० |
| १९६७-६८ | २,५८,२८१·०६ | १,५७,५९६·९० | १,००,६८४·१६ | ६,१५,१४०·८६ |
| १९६८-६९ | २,६२,२०६·६३ | १,५०,०५६·१६ | १,०४,१५०·४७ | ७,१९,२९१·३३ |

सारिणी क्रमांक ५·१३ पुढे चालू

| बाजार वर्ष | एकूण उत्पन्न | एकूण खर्च | बचत | कायम निधी |
|---|---|---|---|---|
| १९६९-७० | २,८०,२८९·७० | १,८२,१९५·७० | ९७,०९४·०० | ८,१६,३८५·३३ |
| १९७०-७१ | २,७७,८१९·३१ | १,९२,४२०·४८ | ८५,३९८·८३ | ९,०१,७८४·१६ |
| १९७१-७२ | २,४४,३५१·२४ | २,२४,४२१·९२ | १९,९२९·३२ | ९,२१,७१३·४८ |
| १९७२-७३ | २,३०,०१७·९२ | २,२६,८०८·०५ | ३,२०९·८७ | ९,२४,९२३·३५ |
| १९७३-७४ | २,८८,४६८·६५ | २,३१,५२२·५५ | ५६,९४६·१० | ९,८१,८६९·४५ |
| १९७४-७५ | ४,६०,००३·३३ | २,८२,१२६·६८ | १,७७,८७६·६५ | ११,५९,७४६·१० |
| १९७५-७६ | ४,५५,६३७·७४ | ३,४९,२०२·३७ | १,०६,४३५·३७ | १२,६६,१८१·४७ |
| १९७६-७७ | ५,३२,२२४·५१ | ३,११,९९४·८५ | २,२०,२२९·६६ | १४,८६,४११·०० |
| १९७७-७८ | ७,६१,४०६·७० | ३,२०,७०८·१६ | ४,४०,६९८·४४ | १९,२७,१०९·०० |
| १९७८-७९ | ८,५५,०३७·८१ | १,०९,५५७·२४ | ४,९४,०७०·८० | २४,२१,१८०·०१ |
| १९७९-८० | १०,६५,५६०·०० | १४,९३८·०६ | ८,५५,०३७·८१ | ३२,७६,२१७·९२ |
| १९८०-८१ | ४९,५४२·७६ | ४,४०३७७·२५ | ७,६६,१५५·५८ | ४०,४२,३७३·५० |
| १९८५-८६ | २१,५७,३६१·६७ | ८,९३,६५५·५६ | १२,६३,७०६·४१ | उ·ना· |
| १९८६-८७ | १९,८१,१४७·२१ | ११,८१,७७५·०० | ७,९९,३७२·०२ | उ·ना· |

आधार : १) रौप्य महोत्सवी वर्ष स्मरणिका, "स्मृतीगंधा" कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी, ७ जुलै, १९७६·

२) वार्षिक अहवाल कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी· १९७५-७६ ते १९८०-८१·

उ·ना· : उपलब्ध नाही·

### ५·१४ हमाली व तोलाईदर :

कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी मध्ये ७·११·१९८८ पासून

अंमलात असणारे तोलाई दर सारिणी क्रमांक ५·६ मध्ये व हमालीचे दर सारिणी क्रमांक ५·७ मध्ये दिलेले आहेत· विक्री करणाऱ्यांच्या (शेतकऱ्यांचा) शेतमाल अडत्याकडे गेल्यानंतर प्रत्येक क्विंटलवरील तोलाईचा खर्च विक्रीदारावर म्हणजे शेतकऱ्यावरच बसतो·

हमालीचे दर हे दोन भागांत विभागलेले असतात· पहिल्या भागांत म्हणजे विक्रीदाराने द्यावयाची प्रतिक्विंटल हमाली, या मध्ये साधारणतः गाडीतून पोती काढणे, थप्पी लावणे इ· पर्यंतच्या हमालीचा समावेश होतो· याशिवाय सौदे होताना पोती उघडण्यापासून ते चाळण करणे, पाला करणे (खरेदीदाराने एका अडत्याच्यात अनेक शेतकऱ्याचा एक विशिष्ट शेतमाल खरेदी केल्यानंतर तो माल एकत्रित करणे याला पालाकरणे असे म्हणतात) पोत्यात भरणे आणि काटयावर ठेवण्यापर्यंतची हमाली विक्रीदारांवर बसविली जाते·

दुसऱ्या भागामध्ये खरेदीदारांनी द्यावयाच्या हमालीचा समावेश होतो· यामध्ये साधारणतः पोती किंवा ठेपी काटयावर ठेवणे अथवा काटयावरून काढणे, पोत्याचे तोंड बंद करणे ते थप्पी लावण्यापर्यंतच्या कामाच्या मोबदल्याचा समावेश होतो· हा मोबदला (हमाली) खरेदीदारांनी भरावा लागतो·

## सारिणी क्रमांक ५·६

तोलाईचे दर पत्रक ( ७·११·१९८८ पासून अंमलात आलेले )

| अ·नं· | तपशील | परिमाण प्रति क्विंटल | दर (पैसेमध्ये) | कोणाकडून |
|---|---|---|---|---|
| १· | कापूस (सरकी सहित) | प्रति क्विंटल | ०·५५ | विक्रीदार |
| २· | कापूस (सरकी विरहित) | --"-- | ०·५५ | --"-- |
| ३· | गुळ | --"-- | ०·५५ | --"-- |
| ४· | बटाटा, लसून, चिंच | --"-- | ०·५५ | --"-- |
| ५· | कांदा | --"-- | ०·३५ | --"-- |

सा रणी क्रमांक ५·[illegible]· पुढे चालू

| अ·नं· | तपशील | परिमाण प्रति क्विंटल | दर (पैसेमध्ये) | कोणाकडून |
|---|---|---|---|---|
| ६· | शेंगा, मिरची(सुकी), धने, निंबोळी, निंबोडी-बिया, सुर्यफुल,सुर्यफुल-बिया, इ·चे, | | | |
| | अ) वजन करणे | प्रति क्विंटल | ०·३० | विक्रीदार |
| | ब) भरती पूर्ण करणे | --"-- | ०·३० | --"-- |
| ७· | वरील वस्तुंच्या व्यतिरिक्त शेतमालाचे - | | | |
| | १) वजन करणे | प्रति क्विंटल | ०·२८ | --"-- |
| | २) भरती पूर्ण करणे | --"-- | ०·२८ | खरेदीदार |

आधार : कार्यालयीन माहिती, कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी·

सारणी क्रमांक ५·७

उपविधी क्रमांक २१(२) प्रमाणे प्रतिक्विंटलचे हमालीचे दर पत्रक(७·११·८८ पासून अंमलात आलेले)

| अ·नं· | कामाचा तपशील | शेंगा | धने, सुर्यफूल निंबोळी, निंबोळी-बिया | बटाटा चिंच | हळद, कांदा | शेंगदाणे, करडई, हरभरा, अंबाडी, कारळे, एरंडी, वरईसावा, मोहरी | ज्वारी, बाजरी, उडीद, गहू, तीळ, जवस, मका, हुलगा, मटकी, तूर तांदूळ, | मूग चिंचोका | गुळ लसूण | मिरची (सुकी) | कोणाकडून |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **भाग पहिला :** विक्रीदारांनी द्यावयाची हमाली | | | | | | | | | | |
| अ) | गाडीतून पोते काढणे व थप्पी लावणे | ०·३६ | ०·३६ | ०·४८ | ०·३६ | ०·३० | ०·३० | ०·३० | ०·३६ | ०·४२ | विक्रीदार |
| ब) | पोती उघडणे, चाळण करणे, अगर पाला पद्धतीने स्वच्छ करणे, किंवा ढेपी काटयावर ठेवणे | ०·५४ | ०·५४ | -- | ०·५४ | ०·६० | ०·६० | ०·४८ | -- | ०·४८ | विक्रीदार |
| क) | पोती किंवा ढेपी काटयावर ठेवणे (माल लिलावात काढून विकला नाहीतरच) | -- | -- | ०·३६ | -- | -- | -- | -- | ०·४८ | -- | विक्रीदार |
| | अ) विक्रीदारांच्या पोत्यात शेतमाल भरणे व पोती शिवणे | ०·४८ | ०·३६ | ०·३६ | ०·३६ | ०·३६ | ०·४२ | ०·४२ | ०·४२ | ०·४२ | विक्रीदार |
| | **भाग दुसरा :** खरेदीदारांनी द्यावयाची हमाली | | | | | | | | | | |
| अ) | पोती किंवा ढेपी काटयावर ठेवणे, किंवा काटयावरुन काढणे, पोत्याची तोंडे शिवणे, व थप्पी लावणे | ०·६६ | ०·६६ | ०·३६ | ०·६० | ०·३० | ०·३० | ०·३० | ०·६६ | ०·६६ | खरेदीदार |

आधार : कार्यालयीन माहिती, कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी·

संदर्भ :
===

१. दि.श्री. जोशी : आमच्या बाजार समितीची रौप्य महोत्सवी वाटचाल, रौप्य महोत्सवी स्मरणिका "स्मृतीगंध" कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी. ७ जुलै, १९७६ पान नं.१.

२. तत्रैव पान नं. ४

३. तत्रैव पान नं. ४

४. तत्रैव पान नं. ८

५. श्री. दि.शि. सुपेकर : व्यापारी प्रतवारीची बाजार समित्याकडून होत असलेली कार्यवाही, रौप्य महोत्सवी स्मरणिका - " स्मृतीगंध " कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी. ७ जुलै,१९७६ पान नं.२

=0=0=0=0=0=